**Bachelor of Arts (B.A.) Part-I Examination**

**MARATHI (Optional)**

**मराठी (ऐच्छिक)**

**(Literature)**

**(New Course)**

वेळ—तीन तास] [एकूण गुण—100

1. 'बारोमास' कादंबरीचे एक ग्रामीण कादंबरी म्हणून परीक्षण करा. 10

**किंवा**

अलका या व्यक्तिरेखेची स्वभाववैशिष्ट्ये लिहा.

2. "मानवी मनातील सत् आणि असत् या प्रवृत्तींमधील संघर्ष हेच 'अश्रूंची झाली फुले' या नाटकाचे प्रमुख आशयसूत्र आहे." या विधानाची चर्चा करा. 10

**किंवा**

विद्यानंदांचे स्वभावचित्र रेखाटा.

3. पुढीलपैकी कोणत्याही **एकाच गटातील** वाक्यांचे संदर्भासहित अर्थ स्पष्ट करा :— 20

गट 'अ'

(क) "आवं मायगंगे, दूध देणाऱ्या गायी-म्हशीबी ह्या हायब्रीडाचेच धांडे खातात. मंग ते दूध तरी कुठी गावरान राहयलं ?"



(ख) "आर पण उभ्या झाडाचा सौदा कसा काय केला लेका तू. आपल्या घरी चुलीत जाळायला सरपण नसते तरी एक फ़ांदी तोडत नाही आपून."

(ग) "हे अश्रू पुसू नकोस. वाहू देत. या अश्रूंतच उद्याच्या जगाची आशा आहे. या माझ्या अश्रूंची, आणि तुझ्या ... आणि तुझ्याही अश्रूंची आज फुलं झाली आहेत."

(घ) "हे सूर्य नव्हेत. सूर्य एकच. तो तो तिकडे पूर्वेला उगविणारा. पश्चिमेला चमचमणारे हे काजवे आहेत काजवे."

**किंवा**

गट 'ब'

(च) "सगळे सारखेच तुमच्या घरातले. जनावरं अन् माणसंही."

(छ) "शेतकऱ्याची कंधीबी हजामतच. दहाव्याचं मुंडण केल्यावाणी तयो सपाचटच राहयते. तीच त्याच्या जिंदगीची मिळकत."

(ज) "जगानं तुम्हाला घायाळ केलं असलं तरी मी तुमच्या सगळ्या जखमा बऱ्या करीन."

(झ) "उपासमारीच्या धगीतच तर मी लहानाचा मोठा झालोय. पण उपासमारीनं देखील लाचार नाही केलं मला कधी."

4. पुढीलपैकी कोणत्याही **एकाच गटातील** प्रश्नांची उत्तरे लिहा :— 20

गट 'क'

(त) नानूआजाचे व्यक्तिचित्र रेखाटा.

(थ) प्राचार्य विद्यानंदांना तुरुंगात का जावे लागले ?

(द) अनुकृतीच्या सिद्धांताचे विवेचन करा.

(ध) साहित्यिक अभिरुचीचे स्वरूप स्पष्ट करा.

किंवा

गट 'ख'

(प) अलकाने एकनाथाचे घर का सोडले ?

(फ) शंभूमहादेवचे व्यक्तिचित्र रेखाटा.

(ब) ध्वनी या काव्यतत्त्वाचे विवेचन करा.

(भ) कॅथार्सिसची संकल्पना स्पष्ट करा.

5. खालील सर्व प्रश्नांची उत्तरे लिहा :— 20

(य) 'बारोमास' कादंबरीचा शेवट वर्णन करा.

(र) 'अश्रूंची झाली फुले' नाटकाच्या शीर्षकाची समर्पकता पटवून द्या.

(ल) मम्मटप्रणीत साहित्य-प्रयोजने कोणती ?

(व) साहित्याच्या मूल्यमापनाविषयीचा लौकिकतावादी दृष्टिकोण स्पष्ट करा.

6. खालील वस्तुनिष्ठ प्रश्नांचे योग्य पर्याय निवडा :— 20

(1) 'बारोमास' कादंबरीतील प्रगतिशील शेतकरी कोण ?

(अ) सुभानराव

(ब) नरुभाऊ

(क) एकनाथ

(ड) मधू



(2) संकरित बियाणांच्या पेरणीला तीव्र विरोध कुणाचा होता ?

(अ) शेवंतामाय

(ब) आबाजी पवार

(क) नानूआजा

(ड) दिलीप पवार

(3) कल्याणीच्या मळ्याच्या गहाणात सुभानरावांना किती रुपये मिळतात ?

(अ) दोन लाख

(ब) पन्नास हजार

(क) एक लाख

(ड) चाळीस हजार

(4) अलकाच्या मनातील एकनाथविषयीच्या रागाचे कारण कोणते ?

(अ) त्याचे निरक्षर असणे

(ब) तो व्यापारी असणे

(क) तो लबाड असणे

(ड) त्याला नोकरी न मिळणे

(5) 'बारोमास' कादंबरीचे लेखक :

(अ) सदानंद देशमुख

(ब) वसंत कानेटकर

(क) वि.स. खांडेकर

(ड) व्यंकटेश माडगूळकर

(6) विद्यानंदांचा बालपणीचा मित्र कोण ?

(अ) लाल्या

(ब) शंभू महादेव

(क) श्याम

(ड) प्रो. आरोळे

(7) 'अश्रूंची झाली फुले' या नाटकात नसलेली व्यक्तिरेखा :

(अ) शंभू महादेव

(ब) विद्यानंद

(क) एकनाथ

(ड) सुमित्रा

(8) "पारिजात तर माझ्या घरात बहरलाय" असे विद्यानंद कोणाला उद्देशून म्हणतो ?

(अ) लाल्या

(ब) सुमित्रा

(क) नीलम

(ड) शंभूमहादेव

(9) लाल्या या व्यक्तिरेखेचे मूळ नाव :

(अ) चुनीलाल

(ब) शंभूमहादेव

(क) धर्माप्पा

(ड) एकनाथ



(10) धर्माप्पा हे कोणत्या नाटकातील खलनायकाचे पात्र आहे ?

(अ) नटसम्राट

(ब) अश्रूंची झाली फुले

(क) बारोमास

(ड) एकच प्याला

(11) मानुषता ही संकल्पना कुणी मांडली ?

(अ) केशवसुत

(ब) शरच्चंद्र मुक्तिबोध

(क) बा.सी. मर्ढेकर

(ड) मम्मट

(12) अर्थलाभ या साहित्य-प्रयोजनाचे स्वरूप :

(अ) कविसंबद्ध

(ब) रसिकसंबद्ध

(क) राजकीय

(ड) सामाजिक

(13) साहित्य-प्रयोजनाबाबत 'प्रीतिरेव प्रधानम्' हा अभिप्राय कुणाचा ?

(अ) क्षेमेन्द्र

(ब) विश्वनाथ

(क) अभिनवगुप्त

(ड) प्लेटो

(14) रा.भा. पाटणकरांनी मांडलेला सिद्धांत :

(अ) लयसिद्धांत

(ब) मानुषता

(क) द्विध्रुवात्मकता

(ड) कॅथार्सिस

(15) 'काव्यासाठी कला' ही भूमिका कुणी मांडली ?

(अ) ए.सी. ब्रॅडली

(ब) शरच्चंद्र मुक्तिबोध

(क) अभिनवगुप्त

(ड) शेक्सपीयर

(16) साहित्याच्या मूल्यमापनासाठी प्लेटोने कोणत्या निकषांवर भर दिला ?

(अ) कलात्मक

(ब) नैतिक

(क) राजकीय

(ड) यापैकी एकही नाही

(17) 'वाक्यं रसात्मकं काव्यम्' हे सूत्र कुणी मांडले ?

(अ) शंकूक

(ब) विश्वनाथ

(क) भामह

(ड) अभिनवगुप्त



(18) वक्रोक्ती हे काव्याचे जीवित आहे ही भूमिका कुणी मांडली ?

(अ) कुंतक

(ब) मम्मट

(क) क्षेमेन्द्र

(ड) भरत

(19) साहित्याचे माध्यम कोणते ?

(अ) भाषा

(ब) संगीत

(क) अक्षरे

(ड) स्वर

(20) वामनाने कोणते काव्यतत्व मांडले ?

(अ) रस

(ब) अनुकृती

(क) रीती

(ड) अलंकार